जिल्हा परिषद पालघर
दिनांक : ९ मे २०१७

विषय : “तन्वी धनवा नैसर्गिक आपतीबधीतना अर्थसाहाय्य योजना”

पालघर जिल्हयातील वाडा येथील जिल्हा परिषद शाळेत दुसरी इयत्तेमध्ये शिकणाऱ्या तन्वी धनवा या आठ वर्षीय विध्यार्थीनीचा शाळेचे गेट पडून अपघाती मृत्यु झाला होता. या घटनेच्या पार्श्वभूमी वर तन्वी धनवा या विद्यार्थीनीच्या स्मरणार्थ पालघर जिल्हा परिषदेमार्फत नैसर्गिक आपत्ती बाधित विध्यार्थीनां अर्थसाहाय्य देणारी योजना सुरु करण्यात आली आहे.

तन्वी धनवा नैसर्गिक आपत्ती योजने अंतर्गत नैसर्गिक आपत्तीमुळे विध्यार्थी मृत्यु झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना १० हजार रुपये (रु. 10,000/-) व शारीरीक अपंगत्व आल्यास २० हजार रुपये (रु. 20,000/-)आर्थिक मदत तात्काळ देण्यात येणार आहे. 5 मे 2017 रोजी झालेल्या स्थायी समितीसमोर या योजनेस मान्यता देण्यात आली असून या योजनाचे कालावधी एप्रिल 2017 ते 2018 मार्चअखेर (2017-2018) असणार आहे. ही योजना पालघर जिल्हयातील शहरी भाग वगळता संपूर्ण जिल्हयात पालघर जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभाग मार्फत राबविण्यात येणार आहे.

तरी उपरोक्त योजनेचे माहिती सुर्व सामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी साहय करावे, ही विनंती.

जनसंपर्क अधिकारी
मनीषा निरभवणे